NAVSHAKTI, FRIDAY, APRIL 1 , 2016

कायद्याचेही उल्लंघन केले असून असे खडसे यांनी स्पष्ट केले.

# टेंभूचे पाणी पिण्यासाठी द्या

## आ.बाळासाहेब पाटील यांची विधानसभेत मागणी

### अनुदानाच्या मागणीवर चर्चा

मुंबई, गुरुवार (विशेष प्रतिनिधी) - टेंभू उपसासिंचन योजनेचे पाणी कराडमधील टँकरग्रस्त गावांना तसेच खटाव तालुक्यातील गावांना देण्यात यावे. तसेच टेंभू योजनेतंर्गत पोटकालव्यांची कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.बाळासाहेब पाटील यांनी आज विधानसभेत केली.

आज विधानसभेत सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील वित्त, जलसंपदा, अन्न आणि नागरी पुरवठा, नियोजन तसेच पर्यटन आदी खात्यांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यात आली. या चर्चेत सहभागी होताना पाटील यांनी सातारा जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा प्रश्न मांडला. रखडलेल्या पाणी योजना पूर्ण करण्याचे आश्वासन सरकारने दिल्याने दुष्काळी भागातील जनतेच्या आशा निर्माण झाल्या आहेत. या भागात गेली दोन वर्ष पाऊस पडलेला नाही. त्यामुळे सरकारने अपूर्ण सिंचन प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत, असे पाटील म्हणाले.

जलसंपदा विभागाकडे निधीचे वाटप करताना प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तेलंगणा तसेच आंध्रप्रदेशच्या धर्तीवर वेगळा निधी निर्माण करण्यात यावा, अशी सूचनाही पाटील यांनी केली. पश्चिम महाराष्ट्रात ९० तालुके हे डोंगरी आहेत. या डोंगरी भागाच्या विकासासाठी निधीत वाढ करण्याची गरज आहे. २००९ मध्ये विधानसभा मतदारसंघाची पुनर्रचना झाल्यानंतर ग्रामीण भागातील मतदारसंघ लोकसंख्येने मोठा झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागासाठी अधिकच निधी देण्यासाठी निकष ठरविणे गरजेचे आहे, असे बाळासाहेब पाटील यांनी सांगितले. एखाद्या गावातील स्वस्त धान्याचे दुकान रद्द करण्यात आले तर ते दुसऱ्या गावात हस्तांतरीत केले जाते. त्यामुळे त्या गावातील लोकांची अडचण होते. ही अडचण दूर करण्यासाठी अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने संबंधित गावातच दुकान द्यावे, अशी सूचनाही पाटील यांनी केली.

# कंत्राटी वीज कामगारांना सेवेत सामावून घेण्यासाठी आरक्षण ठेवणार - ऊर्जामंत्री

मुंबई, गुरुवार (विशेष प्रतिनिधी)- राज्यातील कंत्राटी वीज कामगारांना विद्युत विभागाच्या सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्यात येणार आहे. तसेच नोकरीत प्राधान्यक्रमाने संधी देता यावी, याकरीता या कंत्राटी कामगारांसाठी ठराविक आरक्षण ठेवण्यात येईल, अशी घोषणा ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केली. विधानसभेत तारांकित प्रश्नाला उत्तर देताना बावनकुळे यांनी ही घोषणा केली.

शिवसेनेचे आमदार प्रकाश आबिटकर यांनी हा तारांकित प्रश्न मांडला होता. त्यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, विद्युत विभागाच्या कंत्राटी कामगारांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी थोडे का होईना पण आरक्षण ठेवण्यात येईल. गेल्या अनेक वर्षापासून काम करणाऱ्या या कामगारांना नवीन कामगार भरतीत प्राधान्याने संधी दिली जाईल. तसेच राज्यातील सर्व कंत्राटी कामगारांचा रेकॉर्ड तयार करण्यात येणार असून पुढच्या अधिवेशनात हा रेकॉर्ड पटलावर ठेवला जाईल. या शिवाय प्रत्येक ग्रामपंचायतींना एक विद्युत सेवक देण्यात येणार असल्याचे बावणकुळे यांनी स्पष्ट केले.

घोटाळ्याच्या चौकशी उचित वेळेत पूर्ण करून दोषींवर कारवाई केली जाईल, अशी ग्वाहीही फडणवीस यांनी दिली.

श्री नाथ देवस्थानच्या जमिनीचे बनावट कागदपत्रे तयार करून जमिनीची विक्री सुरू असल्याबाबत राष्ट्रवादीच्या हनुमंत डोळस यांनी आज लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीलाच श्री नाथ देवस्थानची जमीन विक्री घिसाडघाईने आणि योग्य पद्धतीचा अवलंब न करता झाल्याचे सांगितले. एक अर्ज आल्यानंतर तत्कालीन सह धर्मादाय आयुक्तांनी जमीन विक्रीला धर्मादाय आयुक्त यांचा ५ मे २००८ चा आदेश योग्य नसल्याचे दिसते. नियमानुसार जमिनीची नोंद कमी करण्याबाबतचा आदेश पारित झालेला नसल्यास जमीन विक्रीसाठी धर्मादाय सहआयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

तत्पूर्वी, राष्ट्रवादीचे आ.दीपक चव्हाण यांनी दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची तर शशिकांत शिंदे यांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत जमीन विक्रीला स्थगिती देण्याची मागणी केली. शिवसेनेचे राजेश क्षीरसागर आणि भाजपच्या अनिल गोटे यांनी यावेळी उपप्रश्न विचारले.

TATA

**TATA STEEL LIMITED**

नोंदणीकृत कार्यालयः बॉम्बे हाऊस, 24, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-400 001.भारत
दूरध्वनी: 91 22 6665 8282, फॅक्स: 91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 91 आणि कंपनीज (मॅनेजमेंट अँन्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रूल्स, 2014 च्या नियम 10 (1) प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर निर्गमित करण्यात आलेले नॉन कन्व्हरटिबल डिबेंचरवरील व्याज आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंट सूचीबद्ध असलेले थकीत खालीलप्रमाणे आहेः

| अनु. क्र. | नॉन कन्व्हर्टिबल डिबेंचर (एनसीडी'ज) | व्याज थकीत | व्याज देयासाठी रेकॉर्ड तारीख |
|---|---|---|---|
| 1. | 2% एनसीडी'ज एकूण रु. 1,500 कोटीसाठी 23, एप्रिल, 2012 रोजी वाटप केलेले. (ISIN : INE081A08181) | एप्रिल 23, 2016 जे एप्रिल 25, 2016 रोजी अदा करणार | एप्रिल 18, 2016 |

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम के
कंपनी सचिव

मार्च 31, 2016
मुंबई

TATA STEEL

मा.विकास आयुक्त (हातमाग),वस्त्र मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली प्रायोजित.

Handloom mark

स्पेशल हॅण्डलुम एक्स्पो २०१६ | हातमाग कापडाचे प्रदर्शन व विक्री

-: स्थळ :-
कं.डो.म.पा.चे.वै.ह.भ.प. सावळाराम महाराज म्हात्रे क्रिडा संकुलातील बंदिस्त क्रिडागृह (बॅडमिंटन कोर्ट) घारडा सर्कल डोंबिवली (पूर्व).

: दिनांक :
२१ मार्च २०१६ ते ४ एप्रिल २०१६

: वेळ :
स.११.०० ते रा.९.०० पर्यंत

२०% सहभागी संस्थाकडून विशेष सूट

प्रत्यक्ष उत्पादकांकडून वाजवी दरात खरेदी करण्याची संधी एकाच ठिकाणी

कोसा-टसर सिल्क प्रिंटेड साड्या, ड्रेस मटेरियल व शर्ट, ६ व ९ वार कॉटन साड्या, सतरंजी, पंचे, बेडशिटस, चादरी, पिलो कव्हर्स, टॉवेल, नॅपकीन, वॉल हँगिंग्ज, व इतर बरेच काही....

प्रायोजक
विकास आयुक्त (हातमाग)
वस्त्र मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली.

सहप्रायोजक
वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन

आयोजक
महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या. (महाटेक्स) मुंबई